सम्प्रवि/वेतन व देयके/म.शा./
महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्यादित,
प्रकाशगड, ४था मजला, स्टेशन रोड,
वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१
दिनांक - २०.४.२००६

**प्रशासकीय परिपत्रक क्र.३८ दिनांक २०.४.२००६**

विषयः- राज्याचे ज्येष्ठ नागरीक धोरण, २००४ (भाग-१) जाहीर करणेबाबत.

---

सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रिडा व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई- ३२ यांचा शासन निर्णय क्र.ओएएच- २००२/प्र.क्र.४४०/सुधार-१ दि.१४.६.२००४ नुसार संयुक्त राष्ट्र संघाने सन १९९९ हे वर्ष आंतरराष्ट्रीय वयोवृध्द लोकांचे वर्ष जाहीर केल्याचे निमित्ताने महाराष्ट्र शासनाने राज्याचे ज्येष्ठ नागरिक धोरण-२००४ (भाग-१) जाहीर केले आहे. त्यानुसार अखर्चिक बाबीचे धोरण प्रथमतः निश्चित करण्यात आलेले आहे. सदर धोरणातील बाबींची अंमलबजावणी करण्याबाबत आवश्यक कार्यवाही करण्यास्तव शासनाने सूचना दिलेल्या आहेत.

२. वर नमूद केलेल्या धोरणाची अंमलबजावणी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीमध्ये करण्याचा धोरणात्मक निर्णय झाला आहे. सबब या धोरणाची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने क्षेत्रिय कार्यालयांना खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

(१) निवृत्त कर्मचारी/ अधिका-यांसाठी ज्येष्ठ नागरीक धोरण म्हणून त्यांना मिळणा-या आर्थिक सुरक्षेसंबंधी म्हणजे भविष्य निर्वाह निधी, उपदान व इतर सेवानिवृत्ती विषयक लाभ सत्वर चुकते करावेत.

(२) या रक्कमांच्या प्रदानाच्या विलंबासाठी जबाबदारी निश्चित करावी.

(३) नियत सेवावधी पूर्ण झालेल्या वयस्क व्यक्तींसाठी असलेली तक्रार निवारण यंत्रणा सर्व पातळीवर उभारावी.

(४) या प्रकरणी विशेषतमः विधवाकडे विशेष लक्ष देण्यात यावे.

वरील प्रमाणे सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

(स.अ.पाटील)

**मुख्य महाव्यवस्थापक (कर्मचारीवर्ग)**

प्रति,
म.रा.वीज वितरण कंपनी मर्यादितच्या प्रेषण यादीनुसार